आर. सी. एस. क्र. 103/2020
निवृत्ती / युवराज
CNR No. MHOS140002622020

# आदेश नि. क्र. 26, 30 खाली

यातील वादी क्रमांक १ हे दिनांक ०७.११.२०२२ तर वादी क्रमांक ५ हे दिनांक ०१.०६.२०२१ रोजी मयत झालेले आहेत. त्यांचे वारस वादी क्रमांक २ ते ४ हे आहेत. सबब, नव्याने त्यांच्या वारसांना रेकॉर्डवर आणण्याची आवश्यकता नाही. म्हणून वादीने निशाणी क्रमांक २६ वर तसा अर्ज दिला व निशाणी क्रमांक ३० वर झालेल्या विलंबासाठी विलंब माफीचा अर्ज सादर केला आहे. त्या दोन्ही अर्जावर प्रतिवादी तर्फे से दाखल केल्याचे दिसून येत नाही. तसेच आज रोजी प्रतिवादी व त्यांचे विधीज्ञ हजर नाहीत. वादी तर्फे विधीज्ञ श्री. डी. ए. निकाळजे हजर. त्यांनी असा युक्तीवाद केला की, मयत वादी क्रमांक १ व ५ यांचे वारस यापुर्वीच रेकॉर्डवर असल्यामुळे वेगळे वारस रेकॉर्डवर आणण्याची आवश्यकता नाही व झालेला विलंब हा वादीच्या अज्ञानामुळे झालेला आहे, म्हणून तो माफ करण्यात यावा.

२. अर्जाचे अवलोकन केले, त्यासोबत दाखल केलेले मृत्यू प्रमाणपत्र पाहिले व त्यावरुन वादी क्रमांक १ व ५ वर नमुद तारखेला मयत झाल्याचे दिसून येतात व त्यांच्या वारसांनी वारस रेकॉर्डवर आणण्यासाठी वेळेत अर्ज सादर केला नाही. त्याकरिता त्यांना बराच उशीर झाला त्या ऊशीराचे कारण त्यांनी माहिती नसल्याचे दिले. वारस रेकॉर्डवर आणणे ही बाब तांत्रिक आहे. झालेल्या विलंबाला प्रतिवादी तर्फे म्हणणे सादर केलेले नाही. सबब, अर्जाला विरोध नाही असे समजून वादी यांनी वारस रेकॉर्डवर आणण्यासाठी जो विलंब केला व त्यासाठी जे कारण त्यांनी समोर केले ते स्विकारुन वादी यांनी निशाणी क्रमांक २६ वर दाखल केलेला वारस रेकॉर्डवर आणण्याचा अर्ज मंजुर करण्यात येतो. करिता खालीलप्रमाणे आदेश

## आदेश

१. निशाणी क्रमांक २६ वर दाखल केलेला वारस रेकॉर्डचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादी क्रमांक १ ते ५ यांच्या नावापुढे मयत लिहिण्याची परवानगी देण्यात येते,

तसेच निशाणी क्रमांक ३० वरील विलंब माफीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

३. खर्चाबद्दल आदेश नाही.

RAJU TUKARAM INGLE

Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2024.07.02 11:32:14 +0530

दिनांकः– ०१.०७.२०२४

( आर. टी. इंगळे )

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 01-07-2024 |
| Order signed by the presiding officer on | - | 01-07-2024 |
| Order uploaded on | - | 02-07-2024 |